प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( साप्रवि), जिल्हा परिषद नाशिक यांचे समोर
माहितीचा अधिकार अधिनियम,2005 कलम 19(1) अन्वये दाखल झालेले प्रथम अपिलाचे कामकाज

प्रथम अपील क्रमांक
सामान्य प्रशासन विभाग

जा.क्र साप्रवि/आस्था-8/मासे/385/19
नाशिक जिल्हा परिषद, नाशिक
दिनांक 8/5/2019

1.श्री. UT-08 राजेंद्र शंकर राऊत,
नाशिक रोड, मध्यवर्ती कारागृह,
नाशिक सर्कल 5/1

अपिलार्थी ...

--विरुध्द--

1.श्री.रणजीत अरूण पगारे,
जन माहिती अधिकारी तथा
कनि.प्रशा. अधिकारी (साप्र) जि.प.नाशिक

उत्तरवादी ...

**माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (1) नुसार प्रथम अपिल**

**-: विवेचन :-**

श्री. UT-08 राजेंद्र शंकर राऊत,नाशिक रोड, मध्यवर्ती कारागृह, नाशिक सर्कल 5/1 अर्जदार यांनी जन माहिती अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडेस, 1) जर एखादया शासकिय कर्मचा-याविरुध्द एखादा फौजदारी गुन्हा दाखल झाला तर त्या सरकारी कर्मचा-याच्या i) नोकरीबाबत ii) चालु असणा-या वेतनाबाबत iii)PF व इतर Funds बाबत काय कारवाई होते? याची माहितीमिळणे. 2) एखादया शासकिय कर्मचा-यावर फौजदारी गुन्हा दाखल झाल्यानंतर त्या सरकारी कर्मचा-यांवर होणा-या कारवाई बाबत महाराष्ट्र शासनाने पारित केलेल्या शासन निर्णयाची (G.R.) ची साक्षांकित सत्यप्रत मिळणे. इ. दिनांक 22/3/2019 रोजीचा माहिती अधिकार अर्ज दिनांक 28/3/2019 रोजी कार्यालयास व संकलनास दिनांक 30/3/2019 रोजी प्राप्त झाला होता.

अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहितीला अनुसरुन जा.क्र.साप्रवि/आस्था 8/245/2019 दिनांक 30/3/2019 अन्वये 1) अपिलार्थी यांनी मागविलेली माहिती हि माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चा कलम 2 (च) च्या व्याख्येशी विसंगत असलेने सदरची माहिती आपणास पुरवता येत नाही. 2) सदरची माहिती महाराष्ट्र शासनाचे www.maharashra.gov.in या संकेत स्थळावर आपणास उपलब्ध होईल असे पोष्टाव्दारे कळविण्यात आले होते. परंतु,अपिलार्थी हे सध्दस्थितीत कारागृहात असलेने संकेत स्थळावरुन उपलब्ध करुन घेऊ शकत नाही म्हणुन माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 19 (1) नुसार दि. 6/4/2019 रोजी चा प्रथम अपिल अर्ज या कार्यालयाकडे दि.11/4/2019 रोजी प्राप्त झाला.

अपिल अर्जाच्या अनुषंगाने दिनांक.6/5/2019 रोजी कार्यालयीन वेळेत सुनावणी अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हा परिषद,नाशिक यांच्या दालनात ठेवण्यात आली. श्री.रणजीत पगारे, जन माहिती अधिकारी तथा कनि. प्रशा.अधिकारी (साप्र) जि.प.नाशिक हे उपस्थित होते. अपील अर्जदार, श्री. UT-08 राजेंद्र शंकर राऊत हे कारागृहात असल्याने उपस्थित राहु शकत नाही. किंवा प्रतिनिधी हजर करु शकत नाही असे अपिल अर्जदाराने प्रथम अपिल अर्जात नमुद केले असल्याने अपिलार्थी अनुपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिल अर्जदार यांना माहिती उपलब्ध करून दिली किंवा कसे याबाबत विचारणा केली असता जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की अर्जदार अपिलार्थी यांनी, मागणी केलेली माहिती अर्जदार यांना पोष्टाव्दारे जा.क्र.साप्रवि/आस्था 8/245/2019 दिनांक 30/3/2019 या पत्रान्वये माहिती कळविण्यात आलेली आहे. मात्र अपिलार्थी हे सध्दस्थितीत कारागृहात असलेने संकेत स्थळावरुन उपलब्ध करुन घेऊ शकत नाही असे प्रथम अपिल अर्जात स्पष्ट केले आहे. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तीवादावरून मी प्रथम अपिलीय अधिकारी खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

Scanned by CamScanner

-: निर्णय :-

श्री. UT-08 राजेंद्र शंकर राऊत, अपिलार्थि यांचे दिनांक 22/03/2019 चे मुळ अर्जानुसारअपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीपैकि मुददा क्र. 1 ची जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, सा.प्र.वि. जिल्हा परिषद नाशिक यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. मुददा क्र.2 नुसार जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे अशा माहितीचे छायांकित प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना निकालाच्या दिनांकापासुन 15 दिवसांत पुरविणेत यावी.

सदरचे अपिल निकाली काढणेत येत आहे.

(प्रदिप चौधरी)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
जिल्हा परिषद,नाशिक

स्थळ - नाशिक
दि. 06/05/2019

रजिष्टर पोस्टाने
प्रति,

1.श्री. UT-08 राजेंद्र शंकर राऊत, नाशिक रोड, मध्यवर्ती कारागृह, नाशिक- सर्कल 5/1
2.श्री.रणजीत अरूण पगारे, जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (साप्रवि) जि.प.नाशिक

---

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) नुसार व्दीतीय अपील करावयाचे असल्यास सदर आदेशाच्या दिनांकापासुन 90 दिवसांचे आत खालील पत्त्यावर अपिलीय अधिकारी यांचे कडेस अपील करता येईल.

मा.राज्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग,नाशिक खंडपिठ,
पिनॅकल मॉल,चौथा मजला,त्र्यंबकनाका सिग्नल जवळ,नाशिक
तालुका व जिल्हा नाशिक (महाराष्ट्र),दुरध्वनी क्रमांक (0253) 2232764

Scanned by CamScanner